वाचले:-

१. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८ दिनांक २/१२/१९९७

२. शासन निर्णय क्र.अंनियो-२०१९/प्र.क्र.४७०/सेवा-४, दि.०९, मे २०२२.

३. अधिकार प्रदान आदेश क्र.साप्रवि/२/कावि/४५८/२०२६, दि.०३/१०/२०२६.

४. आदेश क्र. साप्रवि/४/कावि/४७९/२०२४, दिनांक १२/०३/२०२४.

५. श्रीम.रजनी सुरेशराव काळे, लिपिक यांचा दिनांक ०८/०९/२०२६ रोजीचा अर्ज.

६.कार्यकारी अभियंता, दूरसंचार विभाग यांचेकडील पत्र क्र.अ.वि.दू.स./आस्था/कावि/२९०/२०२६, दि.२४/०९/२०२६

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८,
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/४/कावि/६८९/२०२६
दिनांक २७/१९/२०२६

विषय:- राजीनामा मंजुरीबाबत.....
श्री.रजनी सुरेशराव काळे, लिपिक (संगणक क्र.१३९३२)

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर जाहिरात क्र.१८४/२०२२ अन्वये 'लिपिक' या अभिनामाची रिक्त पदे सरळसेवेने भरणेत आली होती. कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार श्रीम.रजनी सुरेशराव काळे, यांना 'लिपिक' पदावर पे लेवल एस-६ वेतनश्रेणी र.रु. १९९००-६३२०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: ०२ वर्ष परिवीक्षाधीन कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेकामी उपरोक्त वाचले क्र.४ अन्वये आदेश निर्गत करणेत आला आहे. 'लिपिक' पदावरील श्रीम.रजनी सुरेशराव काळे यांनी जिल्हा परिषद अंतर्गत सहाय्यक शिक्षक, जिल्हा वर्धा येथे निवड झाल्याने महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. श्रीम.रजनी सुरेशराव काळे, लिपिक यांचा मनपा सेवेतील रुजू दिनांक, राजीनामा देण्याचे कारण, मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| कर्मचा-याचे नाव | मनपा सेवेत रुजू दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा अर्ज दिनांक | मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. | मनपा सेवेचा राजीनामा देण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| श्रीम.रजनी सुरेशराव काळे | २६/०३/२०२४ | ०८/०९/२०२६ | CR-HO-C-01165 दिनांक ०८/०९/२०२६ अन्वये र.रु. २१,१००/- | जिल्हा परिषद अंतर्गत सहाय्यक शिक्षक, जिल्हा वर्धा येथे निवड झाल्याने |

उपरोक्त वाचले क्र.५ अन्वये श्रीम.रजनी सुरेशराव काळे, लिपिक यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. श्रीम.रजनी सुरेशराव काळे यांनी मनपा सेवेचा राजीनामा देणेकामी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार मनपा कोषागारात मुळ वेतन भरले आहे. श्रीम.रजनी सुरेशराव काळे यांचेकडून उपरोक्त वाचले क्र.६ अन्वये महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहन कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज व वैद्यकीय अग्रीम येणे बाकी नसून सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसून, त्यांचा लिपिक पदावरील राजीनामा मंजूरीबाबत संबंधित विभागप्रमुखांनी स्पष्टपणे शिफारस केली आहे.

सबब, उपरोक्त वाचले क्र.१ व २ चे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णयामधील तरतुद, विभागप्रमुखांनी केलेली शिफारस व श्रीम.रजनी सुरेशराव काळे यांनी केलेला विनंती अर्ज विचारात घेता मी, उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका वाचले क्र.३ चे प्राप्त अधिकारानुसार, प्रस्तुतच्या आदेशान्वये श्रीम.रजनी सुरेशराव काळे यांचा मनपा सेवेचा राजीनामा दिनांक ०८/०९/२०२६ पासून मंजूर करण्यास मान्यता देत आहे. तसेच श्रीम.रजनी सुरेशराव काळे यांचा दिनांक ०८/०९/२०२६ पासून ते आदेशाचे तारखेपर्यंतचा कालावधी बिनावेतनी करण्यात यावा. लेखापरिक्षणार्थ अन्य काही रक्कम निघाल्यास ती श्रीम.रजनी सुरेशराव काळे यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम.रजनी सुरेशराव काळे यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

Digital Signature
Signature Valid
Name : KHOT SANDEEP DADASAHEB
Designation:Deputy Commissioner
Location:.
Date :27-11-2026 14:02

प्रती - 1) श्रीम.रजनी सुरेशराव काळे, लिपिक

प्रत - 1) लेखा विभाग २. लेखापरिक्षण विभाग ३.सा.प्र.वि टेबल क्र. ७, १०, १२, २० ४. सा.प्र.वि - संगणक कक्ष ५. दूरसंचार विभाग. ६. माहिती व जनसंपर्क विभाग ७. कामगार कल्याण विभाग ८.माहिती व तंत्रज्ञान विभाग ९. अग्निशामक विभाग १०.संबंधित विभाग